'जय सहकार'

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ (पूर्व), जि. ठाणे

नोंदणी क्र. – टिएनए / यु.एल्.आर. / आर.एस. आर. / (सी.आर.) / ३७४ / सन ८९–९०

■ कार्यालय ■

१५२९ 'परिश्रम', महालक्ष्मी नगर, अंबरनाथ (पूर्व), जि. ठाणे. पीन-४२१ ५०१.

"सहकारात ऐपतीपेक्षा पतीला महत्व आहे"

स्थापना : २८ ऑगष्ट १९८९

"शुभ चिंतावे शुभ इच्छावे वचनी शुभ बोलावे
शुभ कर्माच्या सामर्थ्याने करावे जीवनाचे सोने"

सभासद संख्या	६६८
भाग भांडवल	६,१८,७२०
अधिकृत भाग भांडवल	१०,००,०००
मुदत ठेव	१,३७,०००
कर्ज वाटप	७,९७,७००
खेळते भांडवल	१०,४९,७७६
वार्षिक उलाढाल	१२,१८,६१५

५ वा वार्षिक अहवाल

सन १९९३–९४

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ, जि. ठाणे.

– संचालक मंडळ –

श्री. जयवंतराव बंडू काटकर (विशेष कार्यकारी दंडाधिकारी)	अध्यक्ष
श्री. अनंतराव नारायण आंबरे (बी. ए.)	उपाध्यक्ष
श्री. हणमंतराव सदाशिव घनवट	चिटणीस
श्री. भिमराव यशवंतराव सुर्यवंशी (बी. कॉम.)	खजिनदार
श्री. सुभाष शामराव भावसार	संचालक
श्री. अविनाश नारायण खानविलकर	–,,–
श्री. अशोक तुकाराम चौधरी	–,,–
श्री. भालचंद्र यशवंतराव माने	–,,–
श्री. प्रकाश शंकर पाटील	–,,–
सौ. नलिनी कृष्णाजी यशवंतराव	–,,–
श्री. संजय जगन्नाथ दरेकर	–,,–
श्री. भगवान अर्जून उतेकर	–,,–
श्री. हरिश्चंद्र यशवंत येरुणकर	–,,–

– अंतर्गत हिशोब तपासनीस –

श्री. कृष्णाजी रामचंद्र यशवंतराव
बी. कॉम.

श्री. विजय अमृत पाटील
बी. कॉम.

– कायदेशीर सल्लागार –

अॅडव्होकेट : श्री. सुहास गडकरी, कल्याण

– कर्मचारी वर्ग –

श्री. रत्नलाल दादासाहेब घनवट

श्री. केशव शंकर दरेकर

श्री. नाथा बाबुराव लोटके

'जय सहकार'

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ, जि. ठाणे.

सन १९९३–९४ हिशोब तपासणी वर्ग 'अ'

— जाहीर नोटीस —

(फक्त सभासदांकरिता)

दिनांक : २८-७-१९९४

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यांत येते की, संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दिनांक १४-८-९४** रोजी, दुपारी ४ वाजतां वेलफेअर सेंटर, वडवली सेक्शन, अंबरनाथ (पूर्व) येथे आयोजित केली आहे. तरी सर्वांनी वेळेवर हजर रहावे.

—: सभेपुढील कामे :—

१) अध्यक्षांची निवड.
१) मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) सन १९९३–९४ चा अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रकांस मंजुरी देणे.
३) सन १९९३–९४ च्या नफा विभागणीस मंजुरी देणे,
४) सन १९९४-९५ सालाकरितां अंतर्गत हिशोब तपासनीसांची निवड करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
५) सन १९९३–९४ चा वैधानिक हिशोब तपासनीसांचे अहवाल वाचन.
६) कर्मचारी वेतन वाढीस मंजुरी घेणे.
७) मासीक ठेवीबाबत चर्चा करणे.
८) सन १९९४–९५ चे अंदाज पत्रकास मंजुरी घेणे.
९) पोट नियम दुरुस्तीस मान्यता घेणे.
१०) आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर मा. अध्यक्षांचे परवानगीने चर्चा करणे.

श्री. हणमंत सदाशिव घनवट
चिटणीस

टिप –

१) सभासदांनी आपल्या सुचना अगर प्रश्न संस्थेच्या कार्यालयात दि. ८–८–९४ पर्यंत लेखी पाठवाव्यात.
२) सर्व सभासदांनी आपला अहवाल सोबत आणावा.
३) गणपूर्तीच्या अभावी सभा तहकूब झाल्यास सभा अर्ध्या तासांनंतर त्याच दिवशी, त्याच ठिकाणी त्यांच विषयांवर सभेच्या कामकाजास सुरुवात होईल व त्यास गणपूर्तीचे बंधन रहाणार नाही.
४) सभेस उपस्थित रहाणाऱ्या सभासदास भेट वस्तू देण्यांत येईल.
५) सर्व सभासदांना कळविण्यात येते की, ज्यानीं सन १९९१–९२ व १९९२-९३ चा लाभांश घेतला नसेल त्यांनी तो घ्यावा.

'विना सहकार नही उद्धार'

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ, जि. ठाणे.

: पाचवा वार्षिक अहवाल :

सन १९९३—९४

सन्माननीय सभासद बंधू-भगिनिनो,

सप्रेम नमस्कार वि. वि.

जीवनांत सहकाराला अनन्यसाधारण असे महत्व आहे. सहकारा शिवाय कोणताही समाज, गांव, राज्य आणि पर्यायाने देशसुद्धा प्रगती करू शकत नाहीं. म्हणूनच 'विना सहकार नही उद्धार' अशी उक्ती प्रचलित आहे आणि खऱ्या अर्थाने ती सार्थही आहे. तेंव्हा आपली आपल्या गांवची व आपल्या देशाचीसुद्धा प्रगती करावयाची असेल तर प्रत्येक घरा घरांत सहकाराची भावना रुजवली पाहिजे. तेव्हाच आपण आपली व देशाची प्रगती करु शकू. आपली संस्था ही एक सहकाराचं रोपटं आहे, प्रेरणा देणारी प्रयोग शाळा आहे. अशा या रोपट्याला, विचाराचं आचाराचे व कृतीशीलतेच खतपाणी घालून विशाल वटवृक्षांत रुपांतर करुया अशी प्रतिज्ञा करुया.

आज आपल्या सर्वांच्या सहकार्याने संस्थेचा ३१ मार्च ९४ अखेरचा वार्षिक अहवाल, संस्थेची सांपत्तीक स्थिती दर्शविणारे ताळेबंद आणि नफा–तोटा पत्रकें आपल्या समोर सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे. संस्थेने चालू सहकार वर्षात केलेली नेत्रदिपक प्रगती आणि जनमानसांत मिळविलेले मानाचे स्थान हे केवळ आपण केलेल्या सहकार्याचे फळ आहे याची कल्पना देणे हे मी माझे आद्य कर्तव्य समजतो. त्याचबरोबर आपले हार्दिक स्वागत करतो.

सभासद, ठेवीदार, खातेदार, मार्गदर्शक व हितचिंतक यानी केलेल्या निर्भेळ प्रेमामुळे आणि आशिर्वादाने संस्थेची झालेली प्रगती पाहून मला सार्थ अभिमान वाटतो. लोकांमध्ये संस्थेचे सभासद होण्यासाठीचा ओढा पाहून संचालक मंडळाने केलेल्या अथक परिश्रमाचे फळ आहे असेच मी मानतो.

संस्थेची प्रगती दर्शविणाऱ्या खालील तक्त्यावरुन संस्थेची आर्थिक स्थिती लक्षांत येईल.

नं.	तपशील	१९९०-९१	१९९१-९२	१९९२-९३	१९९३-९४
१	सभासद	५९५	६८४	६७२	
२	भाग भांडवल	२,३६,९३०	४,१८,४७०	५,१९,७७०	६,१८,७२०
३	ठेवी	३,९०,५००	४,२३,५००	२,७७,०००	१,३७,०००
४	कर्ज	८,७५,३००	११,६९,०००	६,७९,२००	७,९७,७००
५	खेळते भांडवल	७,०५,३७४-५०	१०,५०,९५०-२५	१०,३६,८६२-००	१०,४९,७७६
६	दैनंदीन ठेवी	–	–	१६,१०५	३१,८३५
७	मासीक ठेवी बचत ठेव	–	–	१,२५०	१२,६७५
८	नफा	२१,१७८-००	७०,८०४-२५	९०,०४१-७५	९३,३८१

ठेवी –

ठेवी हा संस्थेच्या प्रगतीचा पाया आहे. तो मजबूत ठेवण्यासाठी संचालक मंडळ नेहमीच जागृत असते. अहवालसाली संस्थेकडे एकूण रुपये १,३७,०००/– ठेवीच्या रुपाने जमा आहेत.

कर्ज –

सभासदांच्या अडचणी लक्षांत घेऊन संस्थेने सभासदांना सुलभ हप्त्याने, विना विलंब कर्ज सहाय्य देण्याचे धोरण अवलंबीले आहे. सभासदांच्या गरजा भागवून त्यांच्या कुटुंबीयांचे जीवन सुखी, समृद्ध होऊन त्यांच्यात बचतीची भावना रुजविण्याची सदिच्छा ठेऊन संस्थेने अहवालसाली एकूण रुपये ७,९७,७००/– कर्ज वाटप केले आहे.

नफा –

चालू सहकार वर्षात आपल्या संस्थेने अथक परिश्रम करुन संस्थेस एकूण नफा रु. ९३,३८१/– मिळवून दिला आहे. सोबत नफ्याचा विनियोग तक्ता जोडला आहे त्यांस आपण मंजुरी द्याल अशी अपेक्षा आहे.

सभा –

अहवाल सालांत संचालक मंडळाच्या एकूण १४ सभा झाल्या. त्याशिवाय दैनंदीन कामकाज आणि संस्थेच्या प्रगतीच्या दृष्टीने विचार विनिमय करण्यासाठी सायंकाळी ७ ते ९ या वेळांत पदाधिकारी व संचालक कार्यालयात हजर असतात.

श्रद्धांजली –

श्री. सुरेश रामचंद्र मरळे यांचे वडील, श्री. सुखदेव व भास्कर पिटा मोरे यांचे वडील, सभासद कै. गणपत मारुती केंगरे यांना व अशा ज्ञात व अज्ञाताच्या निधनाबद्दल संस्थेच्यावतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

आभार –

संस्थेस खालील मान्यवरांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले त्यांच्या या सहकार्याबद्दल ऋणनिर्देश व्यक्त करणे हे माझे कर्तव्य समजतो—

मा. श्री. नकुल पाटील, अध्यक्ष सिडको, श्री. दादासाहेब नलावडे, माजी नगराध्यक्ष, अंबरनाथ; सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, ता. उल्हासनगर व सहकारी, श्री. देशमुखसाहेब, शाखाधिकारी ठाणे जि. म. बँक अंबरनाथ,

मा. बुटालासाहेब, अप्पर उपलेखा परिक्षक, सहकारी संस्था उल्हासनगर, श्री. बाळासाहेब सोनजे, मुख्याध्यापक म. गांधी विद्यालय, अंबरनाथ; मा. श्री. वसंतराव मोहिरे, लेखाधिकारी म. रा. वि. मं. मुंबई; श्री. एस्. एस्. भगत, जन. मॅनेजर, मेकॉन इंजिनिअरींग कं; श्री. कृष्णाजी रामचंद्र यशवंतराव व श्री. विजय अमृत पाटील, संस्थेचे अंतर्गत हिशोब तपासनीस आणि अनावधानाने राहिलेल्या अन्यांचे लाभलेले मार्गदर्शन व अनमोल सहकार्याबद्दल हार्दिक आभार व अभिनंदन.

समारोप –

सहकारी संस्थेचा उत्कर्ष हा तिच्या कर्जवसुलीवर अवलंबून असतो .आपल्या संस्थेची कर्जवसुली आजपर्यंत १००% होत आली आहे ती कायम राखण्यासाठी आपण सर्वच सभासद बंधू व भगिनींनी सहकार्य दिले आहे. आणि पुढेहि देत रहाल याचा आवर्जून उल्लेख करणे मी माझे आद्य कर्तव्य समजतो. तेंव्हां तिचा उत्कर्ष करण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर आहे. ती पार पाडण्याची प्रतीज्ञा करुया. विशेषत: संचालक मंडळानेही आपली जबाबदारी स्वीकारुन ती पार पाडली पाहिजे.

माननीय सभासद बंधुभगिनींनो आपण आम्हा संचालक मंडळावर जो अमोल विश्वास दर्शविला त्यास कोणत्याही प्रकारे गालबोट न लावतां, आपला नितांत आदर बाळगून संस्थेचा कारभार जबाबदारीने, निस्पृहतेने करुं अशी ग्वाही देऊन संस्थेची आर्थिक स्थिती दर्शविणारा सन १९९३–९४ चा अहवाल, ताळेबंद आणि नफा–तोटा पत्रकें संचालक मंडळाचे वतीने मी आपल्या समोर मंजुरीसाठी विनम्रतेने सादर करीत आहे. तरी त्यास आपणा सर्वांनी मंजुरी द्यावी ही विनंती.

धन्यवाद,

जयहिन्द – जय सहकार

श्री. जयवंतराव बंडू काटकर
अध्यक्ष
संचालक मंडळाचे वतिने

सभासदांना सूचना

१) आपल्या पत्त्यात बदल झाल्यास तो बदल लेखी स्वरुपात संस्थेस कळवावा, म्हणजे पत्रव्यवहारास सुलभ होईल.

२) सभासदास वारस नेमता येतो. ज्यांनी वारसाची नोंद केली नसेल त्यांनी रीतसर अर्ज करून वारस नेमावेत व भविष्यातील अडचणी टाळाव्यात.

३) आपली पत आणि पतसंस्थेचा दर्जा वाढविण्यासाठीं घेतलेल्या कर्जाचे हप्ते आणि भाग वर्गणी नियमित भरुन संस्थेस सहकार्य करावे व त्याचा फायदा लाभांश रुपाने मिळवावा.

४) पतपेढीचे काम सहकारी कायदा अधिनियम-नियम यांना अनुसरून करावे लागते; तेंव्हा आपल्या व्यवहारा संबंधीत कांही अडचण असल्यास ती समजाऊन घेऊन व्यवस्थापक मंडळास सहकार्य करावे.

५) कर्ज घेण्यासाठी विश्वासु तिघांचा गट करा व त्यात सहसा बदल करु नका.

६) पतपेढीकडून कर्ज मिळविणे हा उद्देश न ठेवता आपल्या मिळकतीतून बचत करा व ठेव ठेवा.

७) सभासद झाल्यापासून सहा महिन्यानंतर, सभासद कर्ज मागणीस व जामिन राहण्यास पात्र ठरेल.

८) कर्ज मंजुरीसाठी दोन जामिनदारांची आवश्यकता राहील. सोबत त्यांची पगार पत्रके व अर्जदाराचे पगार पत्रक आवश्यक राहील.

९) सभासद हा फक्त दोन कर्जदारांना जामिन राहू शकेल.

१०) कर्जाची परतफेड कमाल ३६ हप्यात करावी लागेल.

११) कर्ज घेते वेळी कर्जदार दोन्ही जामिनदारासह प्रत्यक्ष हजर रहाणे आवश्यक आहे.

१२) कर्जाचे हप्ते व वर्गणी भरतेवेळी आपले पासबुक सोबत आणावे व भरुन घ्यावे.

– संस्थेची उद्दीष्टे –

१) सभासदामध्यें प्रामाणिकपणा, काटकसर, स्वावलंबन व सहकाराची भावना रुजविणे.

२) सभासदांना त्यांच्या संकटकाळी, आपत्तीच्या काळात मदत करणे.

३) आपल्या सहकार्यातून सभासदांचे जीवनमान उंचावण्यास हातभार लावणे.

४) सभासदामध्यें अल्पबचतीची सवय निर्माण करुन भविष्यातील अडचणीवर मात करण्यास मदत करणे.

५) वाजवी शर्तीवर कर्ज मिळवून देण्यास मदत करणे.

६) वरिल उद्दीष्टांच्या पूर्ततेसाठी इतर कामे हाती घेणे.

– आवाहन –

प्रिय सभासद बंधु-भगिनींना विनम्र आवाहन! मी पतपेढीचा अध्यक्ष या नात्याने आपणा सर्वांना आवाहन करु इच्छितो की, आपली ही विशाल उद्दीष्टे साध्य करावयाची असतील तर मोठ्या भांडवलाची आवश्यकता आहे. आपल्या गरजा भागविणे सोईचे व्हावे म्हणून आपण स्वतः, आपले मित्र व स्नेही यांचेकडून ठेवीद्वारे जास्तीत जास्त भांडवल उभारण्यासाठी आपल्या अनेक हातांच्या सहकार्याची अपेक्षा बाळगतो. आपल्या ठेवींवर आकर्षक व्याज दिले जाईल. तरी माझ्या सभासद बंधु आणि भगिनिंनो आपण योग्य प्रतिसाद द्याल ही अपेक्षा.

जयहिंद!

श्री. जयवंतराव बंडू काटकर
अध्यक्ष

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ, जि. ठाणे

नोदणी क्र. – टिएन्ए / यु.एल.आर. / आर.एस.आर. / (सी. आर.) / ३७४ / सन ८९–९०

तेरीज पत्रक नंबर १.

दिनांक १–४–९३ ते दिनांक ३१–३–९४ अखेर

जमा	रक्कम रुपये		नांवे	रक्कम रुपये	
आरंभीची शिल्लक – रोख	५०९	००	कर्ज खाते	७,९७,७००	००
– बँक	२२,२१५	००	भाग भांडवल खाते	३१,२९०	००
कर्ज खाते	७,६७,७९०	००	दैनंदीन ठेव	४५,६८७	००
व्याज खाते	२,०३,४४३	००	छपाई	७,८८८	००
भाग भांडवल	१,३०,२४०	००	मुदत ठेव खाते	१,७४,०००	००
दैनंदीन ठेव खाते	३१,८३५	००	बचत ठेव	३,३००	००
छपाई लेखन साहित्य	१,८४९	००	टपाल खर्च	२१४	००
मुदत ठेव खाते	४१,०००	००	बँक लाभांश नांवे	९	००
बचत ठेव खाते	३,५००	००	लाभांश खाते	३३,१५९	००
टपाल खर्च	१९१	००	मासिक / दैनदीन ठेव कमिशन	१,१६४	००
नोटीस फी	१००	००	सादिलवार खाते	१,४२१	००
बँक लाभांश	१२	००	ठेवीवरील व्याज	४६,२५७	००
प्रवेश फी	३१	००	वा. स. सा. सभा खर्च	१,७९६	००
अनामत जमा	१४	००	सरकारी हिशोब तपासनीस फी	२,०३७	००
ठेवीवरील व्याज	५७८	००	सचिव / स. मदतनीस / कर्मचारी वेतन	३२,८००	००
मासिक ठेव खाते	१२,६७५	००	वार्षिक अकौंटींग चार्जेस	१,०००	००
इमारत निधी	२,३५५	००	फर्निचर व फिक्चर खाते	३,९६०	००
बँक व्याज जमा	२२८	००	अधेसिव्ह स्टँम्प	१,२००	००
प्रवास खर्च	५०	००	सभासद भेट वस्तू	१२,०००	००
			सचालक सभा भत्ता	३,३००	००
			ऑफिस भाडे	२,४००	००
			जाहिरात खाते	१,२००	००
			बँक कमिशन	७१	००
			मासिक ठेव खाते	४,०००	००
			देणगी खाते	१,००१	००
			शिक्षण निधी	१,०३७	००
			प्रवास खर्च	८२१	००
			अंतर्गत हिशोब तपासनीस मानधन	१,२०२	००
			कर्मचारी सानुग्रह अनुदान	४,२००	००
			अखेरची शिल्लक – रोख	४३९	००
			– बँक	२,०६२	००
एकूण रुपये	१२,१८,६१५	००	एकूण रुपये	१२,१८,६१५	००

श्री. भि. य. सुर्यवंशी
खजिनदार

श्री. ह. स. धनवट
सचिव

श्री. जयवंतराव बंडू काटकर
अध्यक्ष

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ, जि. ठाणे

नोदणी क्र.–टिएन्ए / यु.एल.आर. / आर.एस.आर. / (सी. आर.) / ३७४ / सन ८९–९०

उत्पन्न – खर्च पत्रक नंबर २.

दिनांक १–४–९३ ते दिनांक ३१–३–९४ अखेर

खर्च तपशिल	रक्कम		उत्पन्न तपशिल	रक्कम	
छपाई व लेखन साहित्य	७,८८८	००	सभासद कर्जावरील व्याज	२,०३,४४३	००
डेड स्टॉक झीज	७३३	००	छपाई व लेखन साहित्य जमा	१,८४९	००
टपाल खर्च	२१४	००	टपाल खर्च जमा	१९१	००
लाभांश नांवे	९	००	नोटीस फी	१००	००
किरकोळ खर्च	१,४२१	००	ठेवीवरील व्याज	५७८	००
दैनंदीन ठेव कमिशन	१,१६४	००	बँक लाभांश	१२	००
वार्षिक सभा खर्च	१,७९६	००	बँक व्याज	२२८	००
कर्मचारी पगार	३२,८००	००	प्रवास खर्च जमा	५०	००
अधेसिव्ह स्टँप	१,२००	००			
सभासद भेट वस्तू	१२,०००	००			
अकौंटिंग चार्जेस देणे	१,०००	००			
संचालक सभा भत्ता	३,३००	००			
ऑफीस भाडे	२,४००	००			
जाहिरात खर्च	१,२००	००			
बँक कमिशन	७१	००			
देणगी नांवे	१,००१	००			
प्रवास खर्च	८२१	००			
अंतरगत हिशोब तपासनीस फी	१,२०२	००			
देणे ऑडिट फी तरतूद	२,०००	००			
देणे शिक्षण निधी	१,०५०	००			
देणे ठेवीवरील व्याज	१५,०००	००			
देणे कर्मचारी बोनस	४,८००	००			
देणे सभासद भेट वस्तू	२०;०००	००			
निव्वळ नफा	९३,३८१	००			
एकूण रुपये	२,०६,४५१	००	एकूण रुपये	२,०६,४५१	००

श्री. भि. य. सुर्यवंशी	श्री. ह. स. घनवट	श्री. जयवंतराव बंडू काटकर
खजिनदार	सचिव	अध्यक्ष

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी

नोंदणी क्र.–टिएन्ए / यु.एल्.आर. / आर.एस.आर. /

ताळेबंद पत्रक नंबर ३

रक्कम ३१–३–९३		कर्ज व देणे	रक्कम		रक्कम ३१–३–९४	
१०,००,०००	००	अधिकृत भाग भांडवल			१०,००,०००	००
५,१९,७७०	००	वसुल भाग भांडवल			६,१८,७२०	००
२२,६१८	००	राखीव निधी	२२,६१८	००	४५,१५९	००
		अधिक प्रवेश फी	३१	००		
		अधिक सन ९२–९३	२२,५१०	००		
		निधी –				
२९,२२३	००	इमारत निधी	३५,२०८	००	७७,३२१	००
१,६७५	००	लाभांश समिकरण निधी	१२,०७०	००		
१,६७५	००	धर्मदाय निधी	६,२१३	००		
२,७००	००	सभासद कल्याण निधी	४,५१५	००		
१२,०००	००	संशयीत व बुडित कर्ज निधी	१३,८१५	००		
३,५००	००	रौप्य महोत्सव निधी	५,५००	००		
		ठेवी –				
२,७०,०००	००	मुदत ठेव	१,३७,०००	००	१,४९,३७८	००
१५,९५५	००	दैनंदीन ठेव	२,१०३	००		
१,४००	००	मासिक ठेव	१०,०७५	००		
–		बचत ठेव	२००	००		
		देणी व तरतुदी –				
२,०३७	००	देणे ऑडिट फी	२,०००	००	६१,१३३	६०
१,०३७	००	देणे शिक्षण निधी	१,०५०	००		
४९,४००	००	देणे ठेवीवरील व्याज	१८,१४३	००		
१,०००	००	देणे अकौंटिग चार्जेस	१,०००	००		
४,२००	००	देणे कर्मचारी बोनस	४,८००	००		
८,३०३	६०	देणे लाभांश	१४,१२६	६०		
–		देणे सभासद भेटवस्तू	२०,०००	००		
–		देणे अनामत	१४	००		
		नफा–तोटा खाते –				
९०,३६८	४०	मागील शिल्लक नफा	४,६८३	४०	९८,०६४	४०
		आधिक चालू नफा	९३,३८१	००		
१०,३६,८६२	००	एकूण रुपये			१०,४९,७७६	००

श्री. भि. य. सुर्यवंशी
खजिनदार

श्री. ह. स. घनवट
सचिव

पतपेढी मर्यादित

(सी. आर.) / ३७४ / सन ८९–९०

दिनांक ३१ मार्च १९९४

रक्कम ३१–३–९३		जिंदगी व येणे	रक्कम		रक्कम ३१–३–९४	
५०९	००	रोख शिल्लक			४३९	००
२२,२१५	००	ठाणे जि. म. सह. बँक शिल्लक			२,०६२	००
		गुंतवणूक –				
७,४००	००	ठाणे जि. म. सह. बँक शेअर्स	१००	००		
		मुदत ठेव – राखीव	७,३००	००	७,४००	००
१०,०१,५६५	००	सभासद दिर्घ मुदत कर्ज			१०,३१,४७५	००
५,१७३	००	डेड स्टॉक				
		मागील डेड स्टॉक	५,१७३	००		
		चालू वर्षी खरेदी	२,१६०	००		
			७,३३३	००		
		वजा १० % घसारा	७३३	००		
			६,६००	००		
		अधिक ३१–३–९४ ची खरेदी	१,८००	००	८,४००	००
१०,३६,८६२	००	एकूण रुपये			१०,४९,७७६	००

श्री. जयवंतराव बंडू काटकर

अध्यक्ष

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ, जि. ठाणे

नोंदणी क्र.–टिएन्ए / यु.एल.आर. / आर.एस.आर. / (सी. आर.) / ३७४ / सन ८९–९०

— नफा विभागणी पत्रक —

सन १९९३–९४

अ. नं.	तपशील		नफा विभागणी रक्कम	एकूण नफा रक्कम
१	मागील शिल्लक नफा	४६८३–४०		
२	सन १९९३–९४ चा नफा	९३,३८१–००		९८,०६४ ४०
३	२५% राखीव निधी		२३,३४५ ००	
४	२% लाभांश समिकरण निधी		१,८६८ ००	
५	इमारत निधी		२,५०० ००	
६	सभासद कल्याण निधी		२,००० ००	
७	संशयीत बुडित कर्ज निधी		३,५०० ००	
८	धर्मदाय निधी		१,५०० ००	
९	रौप्य महोत्सव निधी		१,००० ००	
१०	१०% लाभांश निधी		६१,८७२ ४०	
११	शिल्लक नफा		४७९ ००	
		एकूण रुपये	९८,०६४ ४०	९८,०६४ ४०

श्री. भि. य. सुर्यवंशी
खजिनदार

श्री. ह. स. घनवट
सचिव

श्री. जयवंतराव बंडू काटकर
अध्यक्ष

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ, जि. ठाणे

नोदणी क्र. – टिएन्ए / यु.एल.आर. / आर.एस.आर. / (सी.आर.) / ३७४ / सन ८९–९०

— अंदाज पत्रक —

सन १९९४–९५

जमा तपशील	अंदाजे उत्पन्न १९९४–९५		खर्च तपशील	अंदाजे खर्च १९९४–९५	
सभासद कर्जावरील व्याज	२,२५,०००	००	छपाई व लेखन साहित्य	१५,०००	००
प्रवेश फी	१००	००	किरकोळ खर्च	२,५००	००
बँक लाभांश	१५	००	प्रवास खर्च	१,०००	००
बँक व्याज	८५०	००	टपाल खर्च	५००	००
			वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च	३,०००	००
			संचालक सभा भत्ता	५,०००	००
			सरकारी हिशोब तपासनीस फी	२,२००	००
			शिक्षण निधी	१,१००	००
			कर्मचारी वेतन / मानधन	३५,०००	००
			अंतर्गत हिशोब तपासनीस फी	१,५००	००
			जाहिरात खर्च	१,५००	००
			ठेवीवरील व्याज	२०,०००	००
			ऑफिस भाडे	३,६००	००
			सचिव मानधन	२,०००	००
			भाग परत	३५,०००	००
			नफा	९७,०६५	००
एकूण रुपये	२,२५,९६५	००	एकूण रुपये	२,२५,९६५	००

श्री. भि. य. सुर्यवंशी	श्री. ह. स. घनवट	श्री. जयवंतराव बंडू काटकर
खजिनदार	सचिव	अध्यक्ष

पोट नियम दुरुस्ती

पोट नियम	सद्याचे पोट नियम	पोट नियम दुरुस्ती	दुरुस्तीचे कारण
अ. २–१	संस्थेचे कार्यक्षेत्र सधारणतः अंबरनाथ शहरापुरते मर्यादित राहील.	संस्थेचे कार्यक्षेत्र साधारणतः अंबरनाथ नगर-पालिका परिषद क्षेत्र, कल्याण महानगर पालिका परिषद क्षेत्र, उल्हासनगर नगर-पालिका परिषद क्षेत्र व कुळगांव, बदलापूर नगरपालिका परिषद क्षेत्रापुरते मर्यादित राहील.	संस्थेचे कामकाज व होणारा उत्कर्ष पाहून लोकांना संस्थेचे सभासद होण्या-बद्दल होणारी कुचंबणा टाळण्यासाठी.
आय. १-३	ई) वरील प्रमाणे नफा वाटणी झाल्यानंतर मूळ नफ्याची उरलेली रक्कम व्यवस्थापक समितीच्या मुखत्यारीत खालील प्रमाणे वाटण्यांत येईल. १) शे. २५ टक्के इतकी रक्कम सर्व सदस्यांना त्यांच्या संस्थेतील मागील सहकारी वर्षाच्या मुदतीतील एकत्र (Cumulative) आणि किंवा कायम निधीतील रकमांवर त्यांना जे कांही व्याज मिळाले असेल, त्या प्रमाणांत आणि ऋणको सदस्यांना (Barrowing Members) त्यांना भरणा केलेल्या व्याजाच्या प्रमाणात (Bonus) अधिलाभांश म्हणून वाटण्यांत येईल. २) शे. २० टक्के इमारत निधी. ३) शे. १० टक्के संस्थेच्या नोकरवर्गाला बोनस देण्याकरितां. परंतु, नोकराचा बोनस त्यांच्या २ महिन्याच्या पगारापेक्षा जास्त नसावा.	ई) वरील प्रमाणे नफा वाटणी झाल्यानंतर मूळ नफ्याची ऊरलेली रक्कम व्यवस्थापक समितीच्या मुखत्यारीत खालील प्रमाणे वाटण्यात येईल. १) शे. २५ टक्के इतकी रक्कम सर्व सदस्यांना त्यांच्या संस्थेतील मागील सहकारी वर्षाच्या मुदतीतील एकत्र (Cumulative) आणि किंवा कायम निधीतील रकमांवर त्यांना जे कांही व्याज मिळाले असेल त्या प्रमाणांत आणि ऋणको सदस्यांना (Barrowing Members) त्यांना भरणा केलेल्या व्याजाच्या प्रमाणात (Bonus) अधिलाभांश म्हणून वाटण्यांत येईल. २) शे. २०% इमारत निधी.	१) सभासदांत संस्थेबद्दल आपुलकीची भावना वाढीस लागावी. २) सभासदांना उत्पन्नाचा अधिकात अधिक लाभ होऊन त्याच्यात संस्थेबद्दल आत्मीयता वाढीस लागावी. ३) सभासदांत संस्थेचे व्यवहार नियमित/सुरळीत पार पाडण्याबाबतची भावना निर्माण होऊन संथेच्या उत्कर्षांत भर पडावी म्हणून.

सहकारी लेखा परिक्षकांचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा कलम ८१ (५–ब) आणि
महाराष्ट्र सहकारी संस्थांचा नियम ६९ अन्वये द्यावयाचा.)

मी, श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित या संस्थेचा सोबत जोडलेला ३१-३-९४ या दिनांकाचा ताळेबंद व सन १९९३–९४ या सहकारी वर्षाचे नफा-तोटा पत्रक तपासले असून अहवाल करितो की,

१) मी त्या लेखा परिक्षणाच्या उद्देशासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे / माहितीप्रमाणे व विश्वासा प्रमाणे खालील जरुर ती सर्व माहिती व खुलासा मला उपलब्ध झाला आहे.

२) माझ्या मते व मला मिळालेल्या माहिती व खुलाश्याचे आधारे,

अ) ताळेबंद व नफा–तोटा पत्रक संस्थेने ठेवलेल्या हिशोबी पुस्तकांशी जुळते असून सदर ३१-३-९४ या दिनांकाचा ताळेबंद संस्थेच्या व्यवहाराची (कामकाजाची) सत्य व रास्त स्थिती दर्शवितो आणि नफा-तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफ्याची तोटयाची सत्य व रास्त स्थिती दर्शवितो.

ब) संस्थेचे हिशोब हे त्यावरील टिप्पणीत पात्र राहून महाराष्ट्र सहकारी संस्थेच्या कायद्या–नुसार आवश्यक ती माहिती देणारे आहेत व संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची सत्य व रास्त स्थिती दर्शवितात.

३) माझ्या मते संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा, नियम व संस्थेचे पोटनियम यानुसार आवश्यक असणारी हिशोबी पुस्तके योग्य रितीने ठेवलेली आहेत.

४) सन १९९३–९४ या सहकारी वर्षासाठी संस्थेस लेखापरिक्षण वर्ग 'अ' देण्यात आला आहे.

स्थळ : अंबरनाथ

दिनांक : ११-७-१९९४

अे. जी. बुटाला

(अप्पर उपलेखा परिक्षक, सहकारी संस्था, उल्हासनगर)

टिप :– वर नमूद केलेल्या दाखल्यामध्ये काही बाबी नकारात्मक शेऱ्यास पात्र असल्यास अशा बाबीची कारणे लेखापरिक्षण अहवालांत नमूद करावीत.

BOOK–POST

श्री ________________________

____

____

प्रेषक –

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित
अंबरनाथ, जि. ठाणे.

१९९४, श्री महालक्ष्मी मंदिराशेजारी, श्री महालक्ष्मीनगर
अंबरनाथ (पूर्व) - ४२१ ५०१. जि. ठाणे.